**आज**

धूळ उडे, पान गळे
वारा घाली घाव
पाचोळ्या वाटेवर
शिंपडले दव

उद्या पुन्हा हसे फुल
वेलीवर साजे
फांदीच्या झोक्यावर
दोन क्षण ताजे

नभी धुंद रंगे सूर्य
बुडे खोल शांत
त्याच्याही नशिबाची
नको करू भ्रांत

दूर नाही पैलतीर
वाट नको बघू
लाटांच्या तालावर
मद मस्त जगू

आज रोज तोच आहे
तोच नाही 'आज'
काळाच्या भाळावर
रोज नवा साज

**-----संध्या रानडे**